I.0757

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** किनवट
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0073 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/03/2023 22:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 20/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/03/2023
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/03/2023 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/03/2023 21:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** किनवट ते घनपुर फाटा ,डॉं पिनाटे यांचे धाब्यासमोरील, उंबराचे झाडाखाली, पादोदा शिवार,किनवट
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a)Name (नाव): हनुमंत किशन भुरके
(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1978
(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | इंजेगाव,किनवट,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | इंजेगाव,किनवट,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):
(j) Phone number (फोन नं.):
Mobile (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाळासाहेब नरोबा पांढरे | | | 1. पो स्टे किनवट,कमलाई नगर, हदगाव, ता हदगाव,नां, मु पो कॉंडवाडा, ता सेनगाव,हिं, किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम 3000/ | 3,00C |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 20/03/2023

फिर्याद

मी हनुमंत किशन भुरके, वय 45 वर्षे, रा. इंजेगाव, ता. किनवट, जि. नांदेड, मो.क्र. 9021722495, आधार नंबर: 871751578618.

पोलीस स्टेशन किनवट येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 18/03/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्री नानासाहेब कदम यांचेकडे तक्रार दिली होती की, माझेवर व माझी पत्नी व मुलगा यांच्यावर पो.स्टे. किनवट येथे गुरनं 69/23 कलम 324,323,504,506,34 भादंवि वगैरे प्रमाणे दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार श्री पांढरे यांच्याकडे आहे. त्यांनी मला दि. 16/03/2023 रोजी पोलीस स्टेशन किनवट येथे बोलावून घेतले व त्यांनी मला सदर गुन्हयात कलम 326 व 307 भादंवि हे वाढविणार असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना असे करू नका म्हटल्यावर त्यांनी कलम 326 व 307 ची वाढ न करण्यासाठी व सदर गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्यासाठी दहा हजार रूपयाची मागणी केली. मी त्यांना पैसे देण्यास नकार दिला असता, त्यांनी मला आता अटक करतो म्हणाले. त्यामुळे मी नाईलाजाने माझेजवळील पाच हजार रूपये पांढरे यांना दिले. त्यानंतर त्यांनी मला जामीन दिला व कलम वाढ न करता सदर गुन्हयात मदत करण्यासाठी उर्वरित पाच हजार रूपये सोमवार रोजी घेवून येण्यास सांगितले. पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी मागितलेली रक्कम ही लाच असल्याने सदर लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक 18/03/2023 रोजी दुपारी 13.30 वा सुमारास ला.प्र.वि विभाग नांदेड. कार्यालयात हजर राहुन त्यांचे विरूध्द तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला सदर लाचमागणी पडताळणी कामी सोमवार दि. 20/03/2023 रोजी दोन शासकीय पंचासह किनवट येथे येतो असे कळविले. त्यानंतर आज दि. 20/03/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री कदम साहेब हे दोन शासकीय पंच व त्यांचे पोलीस अंमलदारासह शासकीय वाहनाने मौ. गोकुंदा जवळील एमआयडीसी परिसरात सुरक्षित ठिकाणी सकाळी आले व मला त्याठिकाणी फोन लावून बोलावून घेतले. पोलीस निरीक्षक श्री कदम साहेब यांनी उपलब्ध करून घेतलेले दोन शासकीय पंचापैकी पंच क्र 1 श्री मोहन माधवराव बेरजे व पंच क्रं. 2 श्री प्रमोद माणिकराव कद्रेकर यांचा व माझा परिचय करून दिला. तसेच सापळा पथकातील अमंलदार पोहवा/सचिन गायकवाड, पोहवा/संतोश वच्चेवार व पोका◌ॅ/अरशद खान व चालक पोहवा/मारोती सोनटक्के यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि श्री कदम यांच्या सुचनेवरून मी माझी तोंडी तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर पोनि श्री कदम यांनी मी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी मी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री केली. त्यानंतर त्याठिकाणी पोहवा सचिन गायकवाड यांनी एक नवीन मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकाँर्डर मध्ये टाकुन पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम, माझे व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य रेकाँर्डीग करून घेतले.

त्यानंतर पोलीस हवालदार श्री पांढरे यांची भेट घेवून लाच पडताळणी करणेकामी पोनि नानासाहेब कदम यांनी लाचमागणी पडताळणी अनुशंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा सचिन गायकवाड यांनी डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर चालु करून माझे गळयात दोरीच्या साहयाने आडकवून शर्टच्या आत मध्ये टाकुन माझ्या सोबत पंच क्र.1 श्री मोहन बेरजे यांचे सह पोलीस हवालदार पांढरे यांची भेट घेण्यासाठी माझे कडील मोटार सायकल वरून पोलीस स्टेशन किनवट येथे लाचमागणी पडताळणी कामी 11.04 वाजता शासकीय वाहण थांबलेले ठिकाण पासुन रवाना केले व सदर सापळा पथक हे सदर ठिकाणी थांबून राहिले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशन किनवट येथे गेलो असता. त्याठिकाणी पोलीस हवालदार पांढरे हे हजर होते. त्यांनी मला, माझे पत्नीला व मुलाबाबत विचारपुस करून त्यांचे आधारकार्डची झेराँक्स घेतले व त्यांची



Scanned with CamScanner

कार्यवाही केली व त्यानंतर पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी मला कसं करायच सांगा पटकन, मला काय त्रास दयायची ईच्छा नाही, त्यावर मी तुम्ही सांगा, तुम्ही सांगितले तर आम्हाला कळेल व एक बार आम्हाला अँडजेस्ट करून घ्या अशी विनंती केली. तेव्हा पोहवा पांढरे यांनी करतो हो, देणे न घेणे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना त्यादिवशी केलतो ना असे सांगितले. त्यानंतर पोहवा पांढरे यांनी मला बोला ना पटकनं, काय हाय ते, असे सांगितले. त्यावर मी पाच हजार रूपये दिले कि त्यादिवशी आता किती दयायचे अशी विचारणा केली, तेव्हा पोहवा पांढरे यांनी तुमच्या मनावर काय ते हिशोबानं करायचं, त्यावर मी त्यांना तुम्हीच सांगा अशी विनंती केली, तेव्हा पोहवा पांढरे यांनी पाच दया, देता का पाच असे विचारणा केली, त्यानंतर मी काही तरी कमी करा असे सांगितले. तेव्हा पोहवा पांढरे यांनी करा ना तुमच्या मनानं असे म्हणाले, तेव्हा मी पाच हजार रूपये म्हणाले तुम्ही असे विचारले असता, त्यांनी हं म्हणाले, त्यावर मी तीन हजार रूपये देवूका चालेल ना असे विचारले, त्यावर पोहवा पांढरे यांनी दया असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर मी आता माझेकडे नाही, घेवून येतो म्हणून मी व पंच क्र.1 हे त्या पोलीस स्टेशन किनवट वरून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 11.53 वाजता परत आलोत. तेव्हा पोहवा सचिन गायकवाड यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले. पोलीस निरीक्षक कदम यांनी पंच क्र.1 श्री मोहन बेरजे व माझ्या कडून लाचमागणी पडताळणी दरम्याण घडलेल्या हकीकतची माहिती घेतली व त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले व सदर लाचमागणी पडताळणी दरम्याण पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी पंच क्र.1 मोहन बेरजे यांच्या समक्ष तीन हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निशपन्न झाले म्हणुन पोलीस हवालदार श्री पांढरे यांच्यावर सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. त्या दरम्याण पोलीस हवालदार श्री पांढरे यांचा मोबाईल क्र. 7745001805 वरून माझा मोबाईल नंबर क्रमांक 9021722495 यावर फोन आला. त्यांवेळी त्यांनी कुठ आहेत ये लवकर असे सागितले असता मी त्यांना थोडया वेळात येतो असे सागितले. त्यावेळी पोहवा/सचिन गायवाकड यांनी पोनि श्री कदम यांचे सुचनेवरून डिजीटल व्हाँईस रेकाँर्डरमध्ये सदरचा काँल ध्वनिमुद्रीत केला आहे.

त्यानंतर शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. शासकीय वाहनात पोहवा संतोश वच्चेवार यांनी दोन पंच व मला अँन्थ्राँसिन पावडरचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच सापळा कार्यवाही अनुशंगाने पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम यांनी सर्व सापळा पथकास, मला व पंचाना सविस्तर सुचना दिल्या. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान सापळा पथकातील सदस्यांनी कोणी काय करावे याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चीत केली. तसेच मी सापळा कार्यवाही कामी हजर केलेल्या 3000/- रूपयाच्या रक्कमेस ज्यात 500/- रू. दराच्या 06 चलनी नोटा ज्यांचे क्रमांक पंच क्रंमाक दोन यांनी नोंदवुन घेतले. त्यानंतर सदरील नोटांना पंचासमक्ष पोहवा संतोश वच्चेवार यांनी अँन्थ्राँसिन पावडर लावुन सदरील नोटा पंचासमक्ष माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात काही नसल्याची खात्री करून त्याठिकाणी ठेवल्या. त्यानंतर पोनि श्री कदम यांनी मला पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर माझे गळयातील मोठी दस्ती काढून झटकणे व हातात ठेवणे बाबतचा ईशारा करण्यास समजावुन सांगीतले.

त्यानंतर 12.57 वा. पोहवा सचिन गायकवाड यांनी डिजीटल व्हाँईस रेकाँर्ड चालु करून माझे गळयात दोरीच्या साहयाने शर्टच्या आतमध्ये टाकुन दिले. त्यानंतर मी व पंच क्र.1 मोहन बेरजे असे आम्ही दोघेजन माझे मोटार सायकल ने पोलीस स्टेशन किनवट साठी रवाना झालो. तसेच आमचे पाठोपाठ सापळा पथक शासकीय वाहनाने सुरक्षीत अंतर ठेवुन आमचेवर नजर ठेवुन पोलीस स्टेशन किनवट येथे पोहचले. त्यानंतर मी पोलीस हवालदार श्री पांढरे यांचा शोध घेतला असता, ते मला पोलीस स्टेशन किनवट येथे दिसून न आल्याने मी त्यांना माझे जवळील मोबाईलवरून त्यांचे मोबाईलवर काँल केला असता, त्यांनी मला इंजेगाव फाटयावरील धाब्यावर ये असे सांगितले. त्याप्रमाणे मी व सोबत पंच क्र. 1 मोहन बेरजे असे आम्ही इंजेगाव फाटयाकडे रवाना झालो. आमच्या पाठोपाठ पोनि श्री कदम व सापळा पथक सुरक्षित अंतर ठेवून निघाले. काही अंतर गेल्यावर पोनि श्री कदम यांनी आम्हाला ईशारा करून थांबविले, त्यावेळी पोनि श्री कदम साहेब यांच्या सुचनेवरून पोहवा/सचिन गायकवाड यांनी माझे गळयातील व्हाँईस रेकाँर्डर बंद केले व आमच्याकडे विचारपुस करून आम्हास योग्य त्या सुचना देवून सदर ठिकाणावरून आम्ही इंजेगाव फाटयाकडे रवाना झालो. प्रवासादरम्यान पोदार शाळा, कोठारी फाटयाजवळ पोहचलो असतांना 13.57 वा. चे सुमारास पोहवा पांढरे यांचा माझे फोनवर फोन आल्याने सदरचा फोन पोनि श्री कदम यांचे सुचनेवरून पोहवा/सचिन गायवाकड यांनी ध्वनिमुद्रीत केला. त्यानंतर सदर ठिकाणी पोहवा/सचिन गायकवाड यांनी 13.58 वा. चे सुमारास पुन्हा व्हाँईस रेकाँर्डर चालू करून माझे गळयात टाकून दिले. त्यानंतर मी रनिंगमध्ये असतांना मला पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी पुन्हा काँल करून पाटोदा शिवारातील डाँक्टर पिनाटे यांचे धाब्यावर येण्यास सांगितल्याने मी व पंच क्र.1 असे 14.20 वाजता चे सुमारास पाटोदा शिवारातील डाँक्टर पिनाटे यांचे धाब्यावर पोहोचले असता, त्याठिकाणी उंबराचे झाडाखाली एका खुर्चीवर पोलीस हवालदार श्री पांढरे हे बसलेले होते. तेव्हा



Scanned with CamScanner

मी त्यांचेजवळ गेलो असता, त्यांनी बोला, उंग येडया सारख करू नका. पटकन देवूनसनि निघायचं असे म्हणून माझेकडे लाचेच्या पैशाची मागणी केली. त्यावेळी मी माझे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवलेली अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम तीन हजार रूपये माझे उजव्या हाताने काढून त्यांना दिले, त्यावेळी पोहवा पांढरे यांनी किती आहेत असे विचारले, त्यावेळी मी मोजून घ्या ना असे म्हणालो. त्यानंतर पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी त्यांच्या डाव्या हाताने घेवून त्यांचे पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी माझे गळ्यातील मोठा पांढरी दस्ती काढून झटकून पुर्वनियोजित ईशारा केला असता, त्याठिकाणी जवळच सापळा रचून असलेले पोलीस निरीक्षक श्री कदम व सापळा पथक हे त्या ठिकाणी आले व पोकाँ/अरशद खान यांनी पोलीस हवालदार श्री पांढरे यांचे डाव्या हाताचे मनगटाला पकडून ठेवले व पोनि श्री कदम यांनी स्वतःचा परिचय देवून त्यांना त्यांचे नाव, गाव विचारून लाचेची रक्कम कुठे आहे असे विचारले असता, पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी त्यांचे पॅन्टच्या डाव्या खिश्यात असल्याचे सांगितले. तेव्हा पोकाँ/अरशद खान यांनी त्यांचे हात सोडले असता, पोलीस हवालदार श्री पांढरे यांनी त्यांचे पॅन्टच्या डाव्या खिश्यातून लाचेची रक्कम काढून दिली. सदर घटनास्थळी पोहवा बालासाहेब पांढरे यांची अंगझडती घेतली व त्यांचे ताब्यातून लाचेची रक्कम 3000/- रूपये पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. दोन्ही पंचांनी सदर नोटांचे वर्णनची पडताळणी करून ते बरोबर असल्याची खात्री केली. त्यानंतर सापळा पथकाने त्यांची कार्यवाही करून पोलीस हवालदार श्री पांढरे यांना शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह किनवट येथे आणले. त्यानंतर त्यांचेकडे विचारपुस केली. शासकीय विश्रामगृह, किनवट येथे दोन्ही पंचासमक्ष घडलेल्या घटनाक्रमानुसार पंचानी सांगीतल्या प्रमाणे लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाही पंचनामा तयार करण्यात आला आहे.

तरी आज दिनांक 20/03/2023 रोजी पोलीस स्टेशन किनवट येथील पोलीस हवालदार बालासाहेब नरोबा पांढरे, वय 56 वर्षे, व्यवसाय नौकरी पद पोलीस हवालदार रा. कमलाई नगर, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड यांनी माझेवर पोलीस स्टेशन किनवट येथे दाखल असलेल्या गुरनं 69/2023 कलम 324,323,504,506,34 भादंवि मध्ये कलम 326 व 307 भादंवि ची वाढ न करण्यासाठी व नमूद गुन्हयात मला अटक न करता नोटीस देवून सहकार्य करण्यासाठी माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून यापूर्वीच 5,000/- रूपये स्विकारून उर्वरित 5,000/- रूपये पैकी आज दि. 20/03/2023 रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान मागणी करून तडजोडी अंती 3000/- रू लाचेची मागणी करून त्यांनी ते दिनांक 20/03/2023 रोजी 14.25 वाजण्याचे सुमारास पाटोदा शिवारातील डॉ. पिनाटे यांचे धाब्यासमोरील उंबराचे झाडाखाली सापळा कार्यवाही दरम्यान स्वतः पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Mithun Vishwanath Sawant
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

हनुमंत

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

PSI 4915

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Ganesh Sanjabrao F

**Rank(**पद**):** SI (Sub-Inspector)

**No.(**सं.**):** DGPGSPM8202

Scanned with CamScanner